220
30.7.21
5.00


# Ulhasnagar municipal corporation

# उल्हासनगर महानगरपालिका

मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर - ३

| दुरध्वनी क्र. | विस्तार क्र. | संकेत स्थळ. | ई-मेल आय डी. |
| --- | --- | --- | --- |
| ०२५१-२७२०११६-१२५ | २३२/२६८ | www.umc.gov.in | umc.sanitation@gmail.com |


जा.क्र.उमप/आवि/उप-आ/८३/२०२१
दिनांक:-३० /०७/२०२१

प्रति,
मेसर्स देविचंद लक्ष्मण चव्हाण,
चव्हाण हाऊस, मोहना रोड,
आंबिवली, जि. ठाणे.

**विषय:- दिनांक ०२/०८/२०२१ रोजी दुपारी ०३:०० वाजता निविदेतील अटी व शर्तीनुसार मुळ कागदपत्रासह हजर राहण्याबाबत.**

**संदर्भ:- १) दिनांक २८/०७/२०२१ रोजीच्या छाननी समितीच्या निर्णयान्वये.**
**२) जा.क्र.उमपा/आवि/उप-आ/७९/२०२१, दि. २८/०७/२०२१ रोजीचे बैठकीचे पत्र.**

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते जुनी खडी मरिन जवळ, गायकवाड पाडा, उल्हासनगर – ५, येथिल डंपिंग ग्राऊंडवरील कच-याचे सपाटीकरण करणे व त्यासाठी मशिनरी/वाहने (डोझर, पोकलन, इत्यादी) प्रति तास दराने पुरविणे कामी अभिकर्ता नेमणुकीसाठी सार्वजनिक आरोग्य विभागा मार्फत ई-निविदा क्र. 2021_UMC_692187_1 अन्वये निविदा मागविण्यात आली होती.

त्याअनुषंगाने आपली निविदा प्राप्त झाली असुन. निविदेतील अटी व शर्तीनुसार अपलोड केलेल्या ऑनलाईन दस्तऐवजा बाबत दिनांक १६/०७/२०२१ पर्यंत हरकती मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार मेसर्स झा पी अँण्ड कंपनी, उल्हासनगर यांनी हरकत नोंदविलेली आहे. त्याबाबत दिनांक २८/०७/२०२१ रोजी सकाळी ११:३० वाजता मा. अतिरीक्त आयुक्त तथा निविदा समिती अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीत मेसर्स झा पी अँण्ड कंपनी व आपण उपस्थित केलेल्या मुद्दयानुसार निविदाकार यांनी अपलोड केलेल्या ऑनलाईन दस्तऐवजाची छाननी समितीने छाननी करुन निविदा समिती पुढे सादर करण्याबाबत आदेश दिले आहेत. त्यानुषंगाने आपण अपलोड केलेल्या ऑनलाईन दस्तऐवजा बाबत दिनांक २८/०७/२०२१ रोजी निविदा छाननी समितीने तपासणी केली असता खालिल बाबी निदर्शनास आल्या आहेत. तरी त्याबाबत आपणांस दिनांक २९/०७/२०२१ रोजी दुपारी १२:०० वाजेपर्यंत खालील नमुद कागदपत्राची पुर्तता करण्याकरीता उपस्थित राहण्याबाबत संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये कळविण्यात आले होते.

१) आपण सादर केलेला कामाचा अनुभवाचा दाखला मोघम स्वरुपाचा असल्याने आपल्या कामाचा कालावधी स्पष्ट होत नाही. तरी सदर कालावधीत केलेल्या कामाच्या कार्यादेशाची प्रत सादर करावी.
२) शासन निर्णय क्रमांक:सीएटी/२०१८/प्र क्र १२७/इमा-२, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ नुसार सोबत दिलेल्या नमुन्यानुसार रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर सत्यप्रतिज्ञापत्र (Affidavit) सादर करावे.
३) Bulldozer, Poclain, Skip loader, Hook loader या मशिनरीचे मुळ Tax Invoice, R.C. Book सादर करावे.
४) तसेच निविदेतील अटी व शर्तीनुसार अपलोड केलेल्या ऑनलाईन दस्तऐवजाच्या मुळ कागदपत्रासह उपस्थित राहणे.

तथापि आपण संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये इकडील कार्यालयास आपले प्रतिनिधी म्हणुन आलेले श्री. विक्रम चव्हाण बैठकीत उपस्थित होते. पण आपले प्रतिनिधी यांनी सदर बैठकीत उक्त नमुद कागदपत्राची पुर्तता तसेच निविदेतील अटी व शर्तीनुसार आपण अपलोड केलेल्या ऑनलाईन दस्तऐवजाच्या मुळ कागदपत्राची पडताळणी केली नाही. मला फोन आला मी येतो असे सांगुन बैठकितून बाहेर गेलेत ते परत आलेच नाहीत. तरी मुळ दस्तऐवज व सत्यप्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी पुनःश्च २ दिवसांचा अवधी आपणांस देण्यात येत आहे. त्यानुसार दिनांक ०२/०८/२०२१ रोजी दुपारी ३:०० वाजता सार्वजनिक आरोग्य विभाग या कार्यालयास उपस्थित राहुन मुळ दस्तऐवज व सत्यप्रतिज्ञापत्र सादर करावेत. वरील नमुद कागदपत्रे विहित मुदतीत सादर न केल्यास आपले काहीएक म्हणणे नाही असे समजुन आपली निविदा अपात्र ठरविण्यात येईल. तद्नंतर आपले म्हणणे ऐकुन घेतले जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

उप-आयुक्त (आरोग्य)
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत:- १) छाननी समिती सदस्य यांनी कृपया उपस्थित रहावे.
प्रत:- २) मा. निविदा समिती अध्यक्ष व सर्व निविदा सदस्य
प्रत:- माहितीस्तव.
मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

Scanned with CamScanner